पाणी व स्वच्छता व सहाय्य संस्थेतील प्रतिनियुक्तीने भरण्यात येणारे अधिक्षक अभियंता हे पद कार्यकारी अभियंता या पदामध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदावनत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः आस्था-०४१९/प्र.क्र.३७/पापु-२५
७ वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत
नविन मंत्रालय,लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१
दिनांक : १० जुलै, २०१९

वाचा

१) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शा.नि.क्र. आस्था १००६/प्र.क्र.४७२/पापु-१, दिनांक ०१ जानेवारी, २००८
२) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शा.नि.क्र. आस्था-१००६/प्र.क्र.४७२/पापु-०१ दिनांक २० ऑक्टोबर,२००८
३) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शा.नि.क्र. ग्रा.पा.यो.-१११०/प्र.क्र.१७८/पापु-०७, दिनांक १२ मार्च, २०१२

प्रस्तावना :

केंद्र शासनाच्या सूचनांनुसार ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेसाठी भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत केंद्र पुरस्कृत वर्धित वेग ग्रामिण पाणी पुरवठा योजना, इतर उपमिशन , स्वजलधारा , महाजल, आपलं पाणी इ. कार्यक्रमांचे संनियंत्र व समन्वय तसेच या अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या योजनांच्या गुणवत्ता नियंत्रण व मनुष्यबळ विकासासाठी संदर्भात नमूद केलेल्या क्र. १ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय भारत निर्माण कक्षाची निर्मिती करण्यात आली होती. संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय भारत निर्माण कक्षाच्या कामकाजाकरिता सुधारित पदे उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने संदर्भ क्र. ३ मध्ये नमूद केलेल्या शासन निर्णयाद्वारे राज्यस्तरीय भारत निर्माण कक्ष व संवाद व क्षमता विकास कक्ष यांचे विलीनीकरण करण्यात येऊन पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेची निर्मिती करण्यात आली आहे.

०२. उपरोक्त संदर्भात नमूद केलेल्या क्र. २ च्या शासन निर्णयानुसार अधिक्षक अभियंता हे पद महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून (म.जी.प्रा.) प्रतिनियुक्तीने उपलब्ध करण्याबाबत नमूद केले आहे. तसेच संदर्भातील क्र.३ च्या शासन निर्णयानुसार राज्यस्तरीय भारत निर्माण कक्ष, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेमध्ये (वासो) विलिन केलेला असल्याने अधिक्षक अभियंता हे पद वासोच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने आहे.

०३. राज्यामध्ये ग्रामिण भागातील जनतेला पिण्याचे पाणी पुरविण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय ग्रामिण पेयजल कार्यक्रम व मुख्यमंत्री ग्रामिण पेयजल कार्यक्रम सुरू आहेत. या कार्यक्रमांचे

समन्वयन, संनियंत्रण राज्य पातळीवरुन पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेमार्फत केले जाते. सद्यस्थितीत पाणी पुरवठा कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी वासोमध्ये मनुष्यबळ अपुरे पडत आहे.अधिक्षक अभियंता या संवर्गातील म.जी.प्रा.कडे पदे कमी असल्याने सदयस्थितीत अधिक्षक अभियंता हे पद प्रतिनियुक्तीने मिळण्याची शक्यता कमी आहे.यास्तव पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेतील अधिक्षक अभियंता हे पद कार्यकारी अभियंता या पदामध्ये तात्पुरते पदावन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती . वासोच्या सुधारित आकृताबंध निश्चितीचे काम सुरु असुन तद्नंतर या पदाचा स्वतंत्रपणे समावेश करण्यात येईल.

शासन निर्णय :

०४. पाणी व स्वच्छता सहाय्य संस्थेतील पद अधिक्षक अभियंता (सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी रु. १५,६००-३९,०००/- + ग्रेड पे रु.७,६००/-) हे पद सुधारित आकृताबंध निश्चिती होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात कार्यकारी अभियंता (सहाव्या वेतन आयोगानुसार वेतन श्रेणी रु.१५,६००-३९,०००/- + ग्रेड पे रु.६,६००/-) या पदामध्ये पदावनत करण्यात येत आहे. या पदाचे वेतन व अनुषंगिक भत्ते राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमाच्या सहाय्यकृत निधीतून अदा करण्यात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१०१६५६३६४६२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJASHREE RAHUL SARANG

Digitally signed by RAJASHREE RAHUL SARANG
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=5c072530c0f2940404764b5dc00127bb99ecf9466431dc1a1a4e123b229e41c0,
postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=2b9a36fae4ec39263a2a8df78b48fc28b92b165e239815b0cdcef1a4b5928579,
ou=WSSD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA,
cn=RAJASHREE RAHUL SARANG
Date: 2019.07.10 17:39:14 +05'30'

(राजश्री सारंग)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई.

२. मा .राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव , मंत्रालय, मुंबई.

३. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.

४. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

५. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा,पुणे

६. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

७. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय संस्था(वासो), बेलापूर, नवी मुंबई.
८. सर्व सह सचिव/उप सचिव/मुख्य अभियंता तथा वि.का.अ. पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
९. मुख्य प्रशासकीय अधिकारी,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१०. सर्व मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
११. सर्व अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
१२. सर्व कार्यकारी अभियंता , महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
१३. सर्व अवर सचिव व कक्ष अधिकारी,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. निवड नस्ती - पा.पु.२५